चर्चा

# विकासाचे चिनी मॉडेल

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

*उगवणाऱ्या महासत्ता म्हणून आज भारत व चीनचे नाव घेतले जाते. त्याचबरोबर पर्यावरणात कार्बन वाढवण्यात २०१५ पर्यंत चीन व भारताचा वाटा ६०% असणार आहे. एकाची चौकट भांडवलशाही-लोकशाही विकासाची, तर दुसरी भांडवलशाही-एकाधिकारशाही विकासाची. परंतु विकासाची किंमत व विकासाचे परिणाम दोन्हींकडे सारखेच आहेत. चीनच्या 'विकासा'वर एक दृष्टीक्षेप!*

विकास म्हणजे काय हा प्रश्न देव म्हणजे काय या प्रश्नाइतकाच गहन होत चाललेला आहे. याचे एक कारण म्हणजे विकास हा (देवासारखाच!) जागतिक प्रश्न आहे पण त्याच्या व्याख्या स्थानिक आहेत. त्यामुळे विकासाचा मार्गही स्थानिक पातळीवर शोधला जातो पण प्रश्नच मुळात जागतिक असल्याने उत्तरे अपुरी तरी पडतात किंवा भलत्याच दिशेने तरी नेतात.

जगाच्या साडेसहा अब्ज लोकसंख्येत एक अब्ज लोक दारिद्र्यरेषेखाली राहतात. त्यांना रोजच्या खाण्यापिण्याचीही भ्रांत असते. आणखी एक अब्जाहून जास्त लोक दारिद्र्यरेषेच्या जरा वरती असतात. थोड्याशा भाववाढीने, एखाद्या नैसर्गिक आपत्तीने, युद्धाने ते अल्पावधीत दारिद्र्यरेषेखाली ढकलले जाऊ शकतात. या वर्षीच्या अन्नधान्याच्या टंचाईने ही परिस्थिती आलीच आहे.

(जरा विषयांतर करून एका प्रकारचे आक्षेप समजावून घेऊ. दारिद्र्यरेषा ही मुळात विकासाची कसोटी असावी का हा प्रश्न उद्भवू शकतो. विकासाची व्याख्या किती अवघड आहे हे यावरून स्पष्ट होते. म्हणजे, प्रत्येक मानवाच्या अन्न-वस्त्र-निवारा या किमान मूलभूत गरजा भागाव्यात असा विकासाचा अर्थ मानला, तरी अन्न-वस्त्र-निवाऱ्याच्या 'किमान' व्याख्येत स्थलकालानुसार फरक पडतो. उदाहरणार्थ मी ज्या पश्चिमेत राहतो तेथे आणि भारतात या गरजांचा अर्थ निराळा आहे. भारतातल्या भारतातही या गरजांच्या बाबत शहरी उच्च मध्यमवर्ग आणि ग्रामीण भूमिहीन शेतमजूर यांच्या कल्पनांत फरक असतो. मग शिक्षण, आरोग्य, आचार-विचार स्वातंत्र्य या पुढच्या गरजांबाबत जागतिक स्तरावर एकमत होणे अशक्यच असते. तेव्हा दारिद्र्यरेषेसारख्या संकल्पना मापदंड म्हणून योग्य की अयोग्य याचा कीस काढण्यात फारसा अर्थ दिसत नाही.)

परत जगातील गरीबीकडे वळू. गरीबांच्या एवढ्या प्रचंड संख्येचा, मूलभूत गरजांचा प्रश्न राष्ट्रांच्या सीमा पार करतो. गरीब लोक आफ्रिकेत असतात, बांगलादेशात असतात, भारतात असतात - एवढ्याच अर्थाने हा प्रश्न राष्ट्रांच्या सीमा पार करतो असे नाही, तर या गरीबीची कारणे आणि म्हणून उत्तरेही बऱ्याचदा राष्ट्रांच्या सीमांच्या बाहेर असतात. विशेषत: आज जागतिकीकरणामुळे राष्ट्रांच्या भौगोलिक सीमांना न मानता आंतरराष्ट्रीय व्यापार चालूच रहातो.

मात्र त्या त्या राष्ट्रालाच आपल्या राष्ट्रांतर्गत गरीबीचे उपाय करावे लागतात. म्हणून राष्ट्र या कल्पनेची तपासणी विकासाचा विचार करताना महत्त्वाची ठरते. राष्ट्र म्हणजे भौगोलिक सीमांनी मर्यादित केलेला प्रदेश ही वस्तुस्थिती. या प्रदेशातील लोकांना सुरक्षित राखण्यासाठी सत्ता आणि हिंसा यांची मक्तेदारी राष्ट्राकडे असते. बहुधा ही मक्तेदारी काही वर्गांचे हितसंबंध राखण्यासाठी असते. त्यामुळे अगदी लोकशाहीतही तळातल्या स्तराचे 'हितसंबंध' राखले जातीलच याची हमी नसते. सत्ताधारी माणसे बदलली तरी सत्तेचे तर्कशास्त्र आणि हितसंबंध कायम राहतात. म्हणजे, एकीकडे जागतिक प्रक्रियांचा आपल्या राष्ट्रातील नागरिकांवर होणारा परिणाम सुसह्य करण्यास राष्ट्र अपुरे पडते; (जगभर आज तेलाचे भाव भडकते आहेत. त्यावर कोणत्याच एका राष्ट्राचे नियंत्रण नाही हे एक साधे उदाहरण.) दुसऱ्या

बाजूला राष्ट्र जागतिक संदर्भात विकासाच्या दृष्टीने न्याय्य असेलच असे नाही. आपल्या लोकांच्या गरजा भागवण्यासाठी इतर राष्ट्रांच्या लोकांच्या गरजा नाकारणे हेही कार्य राष्ट्र करते. उदाहरणार्थ, अमेरिकन जनतेला खूष राखण्यासाठी तेथे पेट्रोल स्वस्त रहावे म्हणून मध्यपूर्वेतील राष्ट्रांवर युद्ध लादायला अमेरिका कचरत नाही. किंवा आपल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न कायम रहावे म्हणून पश्चिमेतील राष्ट्रे शेतमालावर अवाजवी सबसिडी देतात. त्याचा अनिष्ट परिणाम अविकसित राष्ट्रातील शेतीवर होतो याची पश्चिमेला फिकीर नसते. म्हणजे आपल्या नागरिकांच्या विकासासाठी तेच राष्ट्र इतरांच्या विकासाची संधी हिरावून घेऊ शकते.



*प्रदूषणामुळे चीनमधील नद्या अशा मृतपाय झाल्या आहेत. फेसाळ प्रदूषित पाण्यात 'जीवन' शोधणारा माणूस...*

याला एक संलग्न मुद्दा लक्षात घ्यायला हवा. अमेरिका किंवा पश्चिमेतील सगळीच विकसित राष्ट्रे लोकशाही राष्ट्रे आहेत. तेव्हा, लोकशाही आणि राष्ट्र या दोन्ही मूल्यांची भूमिका विकासाला पोषक असतेच असे नाही.

आता विकासाच्या दिशा पाहू. भांडवलशाही आणि व्यापार करतात तो विकास ही विकासाची प्रमुख दिशा आजवर राहिलेली आहे. या दिशेला दोन प्रमुख आदर्शवादांनी जागतिक स्तरावर पर्याय मांडले. एक साम्यवादी-समाजवादी, दुसरा गांधीवादी. कारणे काहीही असोत, आजच्या घटकेला तरी हे दोन्ही आदर्शवाद जगातील मोठ्या लोकसंख्येच्या विकासाची दिशा ठरवतात असे दिसत नाही.

त्यामुळे विकास म्हणजे भांडवलशाही दिशा असे समीकरण रुढ झाले आहे. मग भांडवलशाही-एकाधिकारशाही विकास का भांडवलशाही-लोकशाही विकास हे त्यातील पोटभेद. विकासाच्या दृष्टीने माझ्या मते त्यात उडदामाजी काळे-गोरे एवढाच फरक दिसतो. कारण समाजातील जो वर्ग विकासाची किंमत मोजतो, त्याच्याकडे दुर्लक्ष, त्याच्या हक्कांची पायमल्ली व प्रसंगी त्यांना वाऱ्यावर सोडणे हे प्रकार या दोन्ही व्यवस्थांमध्ये आढळतात. विकासाच्या अधिकृत शासकीय धोरणाला विरोध करणाऱ्यांना शिक्षा, खोटे खटले, इतर प्रकारचा छळ यांना दोन्ही व्यवस्थात सामोरे जावे लागते.

❖

भांडवलशाही-एकाधिकारशाही या चौकटीतील विकासाचे उदाहरण चीन. तर भांडवलशाही-लोकशाही या चौकटीत भारत विकास करू पाहात आहे. विकासाच्या संदर्भात भारताची चीनशी तुलना करण्याचे कारण म्हणजे दोन्ही देशांत काही बाबतीत साधर्म्य आहे. एकूण लोकसंख्येचा आकार, काही वर्षांपूर्वीपर्यंत दारिद्र्यरेषेखालील प्रचंड लोकसंख्या, प्रादेशिक विषमता, जागतिकीकरणामुळे औद्योगिकीकरणाला व आर्थिक प्रगतीला मिळालेली चालना, इत्यादी.

भांडवलशाही-लोकशाही देशांची व भारताची तुलना फारशी उपयोगी ठरणार नाही कारण फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन वगैरे देश विकासाच्या निराळ्या टप्प्यावर आहेत. उत्पादनावरील भर कमी होऊन सेवाक्षेत्रावर तेथे आता जास्त भर आहे. चीन आणि भारत दोन्ही देश उत्पादन क्षेत्राद्वारे विकास साधू इच्छितात. त्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या हे दोन देश विकासाच्या समान टप्प्यावर आहेत. प्रस्तुत लेखात चीनच्या विकासाची उदाहरणे आहेत. भारतातील नाहीत. परंतु त्या त्या उदाहरणाच्या संदर्भात भारतातील तशा प्रकारच्या घटना व प्रक्रिया सहज लक्षात याव्यात.

हा लेख यापुढे बहुतांशी गेल्या दीड वर्षात प्रसिद्ध झालेल्या इंटरनॅशनल हेराल्ड ट्रिब्यूनमधील अनेक वार्तापत्रांवर आधारित आहे. हे वर्तमानपत्र अमेरिका व युरोपमधून प्रसिद्ध होते आणि ते जागतिक दर्जाचे आहे त्यामुळे त्याच्या वार्तापत्रांच्या निष्कर्षांबद्दल मतभेद होऊ शकतील पण माहितीची सत्यता गृहित धरता यावी. या अनुषंगाने आणखी एक मुद्दा स्पष्ट करायला हवा. पश्चिमेतील विकासाचे भांडवलशाही-लोकशाही हे धोरण राहिलेले आहे. युरोप-अमेरिकेचा विकास या मार्गाने झाला. त्यामुळे विकासाचा हा मार्ग अवलंबणारे देश पश्चिमेला जवळचे वाटतात. उगवणाऱ्या महासत्ता म्हणून आज चार देशांची नावे घेतली जातात. ब्राझील, भारत, चीन आणि रशिया. त्यातील ब्राझील व भारतात लोकशाही आहे. चीन आणि रशियात एकाधिकारशाही आहे. त्यात ही दोन्ही अण्वस्त्रधारी राष्ट्रे आहेत. व्यापारासाठी पश्चिम चीनवर फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. रशिया हा युरोपचा ऊर्जा पुरवणारा प्रमुख देश आहे. दोन्ही देशांचे पश्चिमेशी संबंध फारसे सलोख्याचे नव्हते व नाहीत. या पार्श्वभूमीवर भारताला जरा झुकते पारडे दिले जाते व टीकेचे लक्ष्य चीन व रशियावर रहाते.

पाश्चात्य प्रसारमाध्यमांत व संशोधनवृत्तात हा पूर्वग्रह आढळतो. तो लक्षात ठेवूनही चीनच्या विकासाची दुसरी बाजू पहाणे उद्बोधक ठरावे.

गेल्या वीस पंचवीस वर्षात चीनने तीस-पस्तीस कोटी लोक दारिद्र्यरेषेच्या वरती आणले. इतकी प्रगती इतक्या कमी कालावधीत मानवी इतिहासात प्रथमच झालेली आहे. हा 'विकास' निश्चितच काही किमतीला झालेला आहे. ही किंमत पर्यावरणाच्या संदर्भात आहे, शहरांच्या अतोनात वाढीत आहे, ग्रामीण भागाच्या दरिद्रीकरणात आहे, भ्रष्टाचारात आहे. चीनलाच नाही तर जगभराच्या भावी पिढ्यांना अशा विकासाचे परिणाम भोगावे लागतील अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. व्यापार हेच एकमेव उद्दिष्ट, विकासाचे एकमेव केन्द्र असावे का हा प्रश्न या प्रगतीतून निर्माण होतो.

या लेखात प्रामुख्याने चीनच्या विकासाच्या पर्यावरणावरील परिणामांचा आढावा घेतला आहे. कारण भारतीय औद्योगिकीकरणाची दिशा तशीच दिसते.

हॉलंडमधील एका प्रतिष्ठित संस्थेने जागतिक पर्यावरणविषयक अभ्यास जूनमध्ये प्रसिद्ध केला. पर्यावरणाचे तापमान वाढवणारे अनेक वायू उद्योगधंद्यांमुळे हवेत येतात. आजवर अमेरिका याबाबत आघाडीवर होती. या अभ्यासानुसार ही जागा आता चीनने घेतली आहे. नैसर्गिक अपघात, काही वनस्पतींच्या प्रजाती नष्ट होणे इत्यादी दुष्परिणाम तापमानवाढीमुळे होतात. या शतकाच्या अखेरीस जागतिक तापमानात चार डिग्रीपर्यंत वाढ होईल असा अंदाज आहे. दोन डिग्री वाढ झाली तरी नैसर्गिक आपत्ती मोठ्या प्रमाणावर येतात. आताच दक्षिण अमेरिकेतील मोठ्या प्रदेशातील पिके जास्तीत जास्त तपमानात वाढत आहेत. आहे त्यातून तापमान वाढले तर ती जळून जातील. यातून अन्नधान्याचा तुटवडा आहे त्याहून गंभीर होणे व सामाजिक अशांतता वाढणे हे परिणाम होतील. पर्यावरणाचे तापमान वाढल्याने उत्तर ध्रुवाजवळचा बर्फ अधिक वेगाने वितळतो आणि समुद्राच्या पाण्याची पातळी वाढते. आजच्या अनेक देशांचे मोठे भाग पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. याबरोबर प्रचंड पूर, वादळे यात वाढ होते.

पर्यावरणातील कार्बन वाढणे हे तापमान वाढण्याचे प्रमुख कारण आहे. २०१५ पर्यंत चीन आणि भारत यांचा सहभाग या वाढीत साठ टक्के असेल. आजमितीला हवेत कार्बन डायॉक्साइड सोडणाऱ्या देशांची दरमाणशी वार्षिक आकडेवारी अशी :

अमेरिका-१९.४ टन, रशिया-११.८ टन, पश्चिम युरोप-८.६ टन, चीन- ५.१ टन आणि भारत- १.८ टन.

चीन आणि अमेरिकेने आंतरराष्ट्रीय पर्यावरणनियंत्रणाच्या क्योटो करारावरही सही केलेली नाही.

❖

चीनमध्ये वीस वर्षांपासून चालू असलेल्या औद्योगिकीकरणाचे ध्येय फक्त वाढ हे राहिलेले आहे. त्यामार्गे व्यापार वाढवणे आणि राष्ट्रीय उत्पन्न वाढवणे असा एक कलमी कार्यक्रम राबवण्यात आला व येत आहे. त्यामुळे 'स्वच्छ' उत्पादन प्रक्रियांकडे लक्ष दिले गेले नाही. उत्पादनाची दोन-तीन उदाहरणे पाहू. वीजनिर्मितीसाठी चीनमध्ये प्रामुख्याने कोळसा वापरला जातो कारण तो मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. प्रदूषण होते म्हणून युरोपमध्ये कोळशापासून वीजनिर्मिती केव्हाच बंद झाली आहे. पण तो स्वस्त असल्याने प्रदूषणाकडे चीन लक्ष देत नाही. पर्यावरण कमी दूषित करणारे वीजनिर्मितीचे इतर पर्याय महाग आहेत. पाण्यापासून वीजनिर्मितीसाठी धरणे बांधली जातात ते पुढे पाहू. गॅसपासून, अणुउर्जेपासून, वाऱ्यापासून वीज तयार करता येते. पण चीन किंवा भारताला हे पर्यायी तंत्रज्ञान स्वस्तात द्यायला विकसित जग तयार नाही. म्हणजे तत्त्वत: आज जर हे तंत्रज्ञान स्वस्तात उपलब्ध झाले आणि चीनने कोळशापासून वीजनिर्मिती थांबवली तर संपूर्ण जगच निदान त्या प्रदूषणापासून सुरक्षित राहू शकते. अल्पावधीतच चीन, अमेरिका आणि भारत हे या क्रमाने जगातील सर्वात जास्त प्रदूषण करणारे देश असतील. त्यांच्या प्रदूषणावर नियंत्रण आल्याखेरीज जगातील प्रदूषण मर्यादित रहाणे अशक्य आहे.

चीनमधील दूषित वायूंमध्ये सिमेंट उत्पादनाचा सहभाग वीस टक्के आहे. जगभर बांधकामे प्रचंड वेगाने वाढत आहेत. सिमेंटची मागणीही त्यामुळे वाढत आहे. सिमेंट एकदा वापरले की परत वापरण्याजोगेही रहात नाही. चीन जगातील एकूण सिमेंट उत्पादनाच्या ४५ टक्के सिमेंट बनवतो. या उत्पादनात हवेत कार्बन मोठ्या प्रमाणावर सोडला जातो. काही पाश्चात्य कंपन्यांनी सिमेंटच्या उत्पादनातील कार्बन निर्माण होण्याचे प्रमाण कमी करण्याचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. पण हे प्रमाण जेमतेम वीस टक्क्यांनी खाली आणता येते. या कंपन्यांनी हे तंत्रज्ञान जर विकसनशील देशातील सिमेंट बनवणाऱ्या कंपन्यांना पुरवले, तर त्यांना काही आर्थिक सवलती पाश्चात्य सरकारे देतात. अशा तंत्रज्ञानाचा वापर वाढावा हा त्यामागचा उद्देश. पण या योजनेतील मेख अशी आहे, की जे कारखाने हे तंत्रज्ञान वापरतात, त्यांना उत्पादनवाढीतही परवानगी मिळते. म्हणजे, समजा तंत्रज्ञान वापरले आणि हवेतील कार्बनचे प्रमाण वीस टक्क्यांनी कमी आले तर तेवढ्यावर प्रकरण थांबत नाही. कारखाना उत्पादन त्याच वेळी वाढवतो. हे उत्पादन जर तीस टक्क्यांनी वाढवले तर हवेतला कार्बन गोळाबेरीज करता, वाढतोच.

चीनमधील पोलादनिर्मितीबाबत असाच प्रश्न निर्माण झाला आहे. कोळसा हे इंधन वापरून प्रदूषण होते म्हणून युरोपमधील

-विशेषत: जर्मनीतील - पोलाद कारखाने पूर्वीच बंद झाले. हे कारखाने ७० च्या दशकात चीनने स्वस्तात विकत घेतले. आज जगात सगळ्यात जास्त पोलाद चीन बनवतो. चीनच्या स्वत:च्या औद्योगिकीकरणाला तर हे पोलाद लागतेच पण जगात इतरत्रही लागते. विकसित जगाची मागणी चीन मोठ्या प्रमाणावर पुरवतो.

❖

याबरोबरच कित्येक ग्राहकोपयोगी वस्तू, ॲल्युमिनियम, कागद वगैरे अनेक उत्पादने चीनमधून जगभर जातात. त्यांच्या उत्पादन प्रक्रियेवर प्रदूषणाच्या दृष्टीने नियंत्रण नाममात्र असते. आर्थिक वाढ अधिकाधिक करण्याच्या बेहोशीत अनेक रसायनांच्या उत्पादनातील दूषित पाणी नद्यांमध्ये, तलावांमध्ये सोडले जाते. काही वर्षांपूर्वीपर्यंत शेतीला किंवा प्यायला उपयोगी असणारे पाणी आता दूषित झाले आहे.

तै नावाचा एक जलाशय यांगत्से नदीच्या खोऱ्यात पूर्व चीनमध्ये आहे. त्यामध्ये वर्षानुवर्षे औद्योगिक आणि इतर दूषित द्रव्ये सोडली जातात. त्यामुळे आता या तळ्याच्या जवळ राहणाऱ्या सुमारे वीस लाख लोकांना हे पाणी पिणे किंवा स्वयंपाकासाठी वापरणे शक्य राहिलेले नाही. वू लिहोंग नावाचा तिथला एक माणूस गेले दशकभर या प्रदूषणाविरुद्ध सातत्याने आवाज उठवत आहे.

आधी तो तलावांच्या काठावरील कारखाने तलावात रसायने कशी सोडत आहेत याचे फोटो घेत असे, ते फोटो निनावी पत्रांनी प्रदूषण नियंत्रण कार्यालयांना पाठवत असे. त्याचा उपयोग होईना तेव्हा त्याने नावानिशी पत्रे लिहिण्यास सुरुवात केली आणि प्रदूषण नियंत्रण विभागाला मदत करण्याची इच्छा दर्शवली. या खटाटोपाचा परिणाम सरळ साधा झाला नाही. कधी कधी प्रदूषण विभागाने त्याची मदत घेतली पण कारखान्यांवर कारवाई केली नाही. दरम्यान या निषेधांमुळे स्थानिक शत्रू मात्र निर्माण झाले. कारण सततच्या प्रदूषण विरोधी भूमिकेने जर कारखाने बंद करायची वेळ आली, तर नोकऱ्या जातील असा प्रचार करण्यात आला. मग आजूबाजूचे लोकही त्याच्याशी संबंध ठेवणे टाळू लागले.

मग त्याची नोकरी गेली. घर पत्नीच्या नोकरीवर चालू राहिले. मग एक दिवस ती नोकरी करत असे त्या कारखान्यातून रसायने कशी सोडली जातात हे दाखवण्यासाठी त्याने टेलिव्हिजनच्या लोकांना बोलवले. त्यांनी त्याचे छायाचित्रण केल्यावर तिचीही नोकरी गेली.

सरकारी अधिकाऱ्यांनी त्याची आर्थिक नड ओळखून त्याला नोकरी देण्याचे, एखादा व्यवसाय चालू करायला मदत करण्याचे आमिष दाखवले. प्रदूषण नियंत्रणाच्या कामाशी निगडीत असा व्यवसायही त्याने सुरू केला. त्या व्यवसायात त्याला ठरलेला पैसा तर मिळाला नाहीच पण खोटे बालंट येऊन पुढे कोर्टकचेऱ्यांचा ससेमिरा  लागला.

'आमच्याच मागे का लागतोस, शेजारच्या प्रांतातल्या प्रदूषणाची ही जाहिरात कर' असा सल्लाही देण्यात आला. स्थानिक अधिकाऱ्यांशी या चकमकी चालू असतानाच २००५ साली त्याला पर्यावरण रक्षणाच्या कामाबद्दल सरकारी पारितोषिकही मिळाले. पण तोही त्याला गप्प करण्याचाच भाग होता. कारण लगेचच पुढच्या वर्षी अनेक खोट्या आरोपांखाली त्याला अटक करण्यात आली.

दरम्यान तळ्याची प्रदूषणाची पातळी एवढी वाढली होती की तेथे मिळणारे मासे बंद झाले, आजूबाजूचे नैसर्गिक वनस्पती जीवन पूर्णत: उद्ध्वस्त झाले. नंतर एक प्रकारची बुरशी पाण्यावर आली. त्यामुळे वूझी या जवळच्या मोठ्या शहराचा पाणी पुरवठाच अनेक दिवस बंद करण्यात आला. शेवटी केंद्र सरकारला हस्तक्षेप करावा लागला. यांगत्से नदीचे स्वच्छ पाणी तळ्यात सोडून तळ्यातील बुरशी पुढे ढकलावी लागली. तेव्हा कोठे औद्योगिक उत्पादन जरा कमी झाले तरी चालेल पण प्रदूषण करणारे काही कारखाने बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

वूच्या खटल्यावर या सगळ्या घडामोडींचा काहीच परिणाम झाला नाही. वस्तुत: तो जे सांगत होता, ते खरेच ठरल्याचे उघड होत होते. कोठडीत पोलिसी खाक्याने अत्याचार करून आपण



*शुद्ध हवाही दुर्मिळ!*

गुन्हे केल्याची कबुली त्याच्याकडून घेण्यात आली आणि तीन वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा करण्यात आली.

पाण्याचे प्रदूषण हा एक भाग झाला. त्याच्याशी निगडीत पाण्याची टंचाई हा दुसरा प्रश्न औद्योगिकीकरणाने चीनपुढे उभा केला आहे. वाढती लोकसंख्या त्यात मागणी वाढवते. १९४९ पासून चीनची पाण्याची गरज पाचपट झालेली आहे. चीनमध्ये जगाच्या एकूण पाण्याच्या सात टक्के साठे आहेत. पण चीनची लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या वीस टक्के आहे. बहुतेक सगळे साठे देशाच्या दक्षिणेत आहेत. उत्तर चीनमध्ये शेती जास्त होते. या शेतीत पाणी जास्त वापरले जाते. तेथील भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खाली जात आहे. सध्याच्या वेगाने उपसा चालू राहिला तर पुढच्या तीस वर्षात भूगर्भातील पाणी संपुष्टात येईल असा अंदाज आहे. उत्तर चीन हे जगातील सर्वात मोठे वाळवंट होईल इतपत शक्यता वर्तवण्यात येत आहेत. माओच्या काळापासूनच्या म्हणजे १९६० च्या दशकापासूनच्या अनेक धोरणांचा हा परिणाम आहे. तेव्हापासून प्रचंड धरणे बांधून नद्यांचा पुरवठा खंडित करण्यात आला. त्यामुळे भूप्रस्तरांचे संतुलन बिघडले. तरी भूगर्भातील पाणी मुबलक असल्याने पाण्याची टंचाई भासत नव्हती.

पण नंतरच्या वेगाने होणाऱ्या औद्योगिकीकरणाने पाण्याचा वापर बेसुमार वाढला. एका अंदाजानुसार औद्योगिक क्षेत्रात त्याच प्रकारच्या उत्पादनासाठी चीन पश्चिमेच्या मानाने पाच ते दहा पट जास्त पाणी वापरतो. त्यामुळे जमिनीखालची पाण्याची पातळी दरवर्षी एक मीटरने खाली जात आहे. आता तर शिआ झुआंग या ९० लाख लोकसंख्येच्या भागात ६०० फूट खाली गेले तरी पाणी लागू शकत नाही. सांडपाण्याचा निचराही शास्त्रीयरीत्या न झाल्याने भूगर्भातील झऱ्यात दूषित पाणी मिसळले गेले आहे.

पाण्यावर अर्थातच शेती अवलंबून आहे. धान्याचे उत्पादन पाण्याअभावी कमी झाले आणि चीन एक प्रमुख ग्राहक म्हणून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आला, तर आताच वाढत असलेले अन्नधान्याचे भाव जास्तच कडाडतील. पाण्याचा वापर कमी करावा म्हणून सरकार आता हिवाळ्यातील गव्हाच्या पिकावर नियंत्रण लागू करण्याच्या विचारात आहे. तसे झाल्यास शेतकऱ्यांची उपजीविका हा पहिला प्रश्न, मग होणारा गव्हाचा तुटवडा असे हे दुष्टचक्र सुरु होण्याची शक्यता आहे.

पाण्याचे नियोजन, पुरांवर नियंत्रण आणि कोळशाच्या प्रदूषणयुक्त वीजनिर्मितीला पर्याय यासाठी प्रचंड धरणे बांधण्याचे धोरण पंधरा-वीस वर्षांपासून अंमलात आले. दोन वर्षांपूर्वी Three Gorges Dam हे जगातले सगळ्यात मोठे धरण बांधून झाले. त्याची वीजनिर्मिती २०१२ ला पूर्ण क्षमतेने सुरू होईल. तेव्हा ते जगातील सर्वात मोठे वीजनिर्मिती केंद्रही असेल. अधिकृत आकडेवारीनुसार या धरणामुळे साडेअकरा लाख लोक विस्थापित झाले. हाही एक विक्रमच. २०२० सालापर्यंत चीनला आपली वीजनिर्मिती ३०० गायगॅवॉटस् न्यायची आहे. त्यासाठी यांगत्से नदीवरच आणखी दोन धरणे याच प्रमाणात बांधण्यात येतील. त्या बांधकाम काळात व नंतर बदलणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाने किती लोक विस्थापित होतील याची आकडेवारी आज उपलब्ध नाही.

सध्याच्या धरणामुळे सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची काही प्रागैतिहासिक ठिकाणे कायमची पाण्याखाली गेली आहेत. त्याबरोबर एवढ्या प्रचंड पाण्याच्या वजनाने भूकंपाची शक्यताही वाढली असल्याचे अनुमान आहे. यावर्षीच्या मे मध्ये झालेल्या भूकंपाचे एक कारण तिथून जवळचे दुसरे एक धरण असावे असा संशय आहे.

❖

औद्योगिकीकरणामुळे झालेल्या प्रदूषणाची इतर आकडेवारीही भयावह आहे. जवळ जवळ पन्नास कोटी लोकांना प्यायला शुद्ध पाणी तर मिळत नाहीच पण पोटाच्या कॅन्सरपर्यंतच्या विविध विकारांनी अनेक लोक (काही लाखांत) अकाली मृत्यू पावतात. एकूणच प्रदूषणामुळे कॅन्सरग्रस्तांची संख्या वाढते आहे. चीनमध्ये ५६ कोटी लोक शहरांमध्ये राहतात. त्यातील केवळ एक टक्का लोकांना श्वासोच्छ्वासाला शुद्ध हवा मिळते. सुमारे तीन ते चार लाख दरवर्षी या दूषित हवेने होणाऱ्या फुफ्फुसांच्या विकारांनी व हृदयविकाराने अकाली मरण पावत असावेत असा अंदाज आहे. २०२० सालापर्यंत साडे पाच लाख लोक दूषित हवेमुळे दरवर्षी बळी पडण्याची शक्यता आहे. सल्फर डायॉक्साइड आणि ओझोन या विषारी वायूंचे हवेत वाढणारे प्रमाण याला जबाबदार आहे. शहरांमध्ये आपल्याकडच्या सारखेच प्रत्येकाला चारचाकी घ्यायची असते. त्याच्या धुराने शहरे कायम प्रदूषणाच्या ढगात असतात. शहरांमध्ये नवीन बांधकामेही प्रचंड वेगाने होत आहेत. ही बांधकामे ऊर्जा वाचवण्याच्या दृष्टीने केलेली नसतात. स्वस्त आणि पटकन हा त्यामागचा विचार असतो. त्यामुळे ती गरम ठेवण्यासाठी किंवा गार ठेवण्यासाठी दुप्पट ऊर्जा खर्ची पडते. चार भिंती आतल्या - बंदिस्त जागातील प्रदूषणानेही कित्येक लोकांना विकार होतात. विशेषत: कारखान्यांमध्ये वायुवीजनाचा नीट विचार झालेला नसतो.

२००२ सालापासून 'हरित राष्ट्रीय उत्पन्न' असे धोरण आखण्यात आले. पण ते आदेशच राहिले. एकाधिकारशाही असली तरी एवढ्या प्रचंड देशात वरून खालपर्यंत धोरण पोचण्यात अनेक टप्पे असतात. प्रत्येक टप्प्यावरील शासकीय वर्गाचे हितसंबंध निरनिराळ्या प्रकारे स्थितिप्रियतेत गुंतलेले असतात. त्यात आर्थिक वाढ हा राष्ट्राभिमानाचा भाग झाला की

उद्दिष्टांची लगोलग पूर्तता याचीच धुंदी रहाते. मुळात चीन आंतरराष्ट्रीय व्यापारात कमी दराने माल पुरवू शकतो याचे कारण स्वस्त आणि आरोग्याची आणि पर्यावरणाची पर्वा न करणारे तंत्रज्ञान आहे. चीन जर पश्चिमेच्या मापदंडाने बांधकामे करू लागला, उत्पादनाची प्रक्रिया काटेकोरपणे पाळू लागला, तर त्याला आंतरराष्ट्रीय व्यापारात स्पर्धा जमणार नाही.

या कमी दराच्या उत्पादनात मानवी श्रमाची कमी किंमत हेही प्रमुख कारण आहे. चीनमध्ये पगार युरोप-अमेरिकेच्या तुलनेत पाच टक्के असतात. मध्यंतरी एका मोठ्या शहरातील कारखान्यांत निम्न स्तरावर काम करणाऱ्या तरुण स्त्रियांची बातमी आली होती. या सगळ्या स्त्रिया ग्रामीण भागातून शहरात उपजीविकेसाठी आल्या. सहा-सात जणी एका खोलीत रहातात. सगळ्या जणी अविवाहित आहेत. कामाचे तास रोजचे पंधरा ते सोळा तास असतात. वेतन मिळाल्याची सही एका आकड्यावर घेतली जाते, प्रत्यक्षात हातात त्याहून कमीच पैसे मिळतात. पण त्याहूनही कमी वेतनावर काम करायला तयार असणाऱ्यांची फौज कारखान्याबाहेर उभी असते. त्यामुळे नोकरीही सोडता येत नाही. यातील बऱ्याच स्त्रियांना अकाली वृद्धत्व येते. मानसिक विकार जडतात, अकाली मृत्यूही येतात.

एकाधिकारशाही व सत्तेचे केंद्रीकरण असले की प्रसारमाध्यमेही स्वतंत्रपणे अशा घटनांवर आवाज उठवू शकत नाहीत. पण अनधिकृत अंदाजांनुसार स्थानिक शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध, केंद्रीय धोरणांविरुद्ध ठिकठिकाणी असंतोषाचे उद्रेक सतत होत असतात. कधी ते दडपले जातात कधी त्यावर थोडाफार इलाज केला जातो.

शासकीय हितसंबंधांबरोबरच, आपल्याकडच्यासारखाच अचानक जन्माला आलेला प्रचंड मध्यमवर्गही ही आर्थिक वाढ रोखण्यास विरोध करतो. कारण या मध्यमवर्गाचे अस्तित्वच या वाढीवर अवलंबून आहे. उपभोक्तावाद हा त्याचा आदर्शवाद आहे. मग राष्ट्रप्रेम हे त्यावरचे आवरण मोहक ठरते. कारण खरे राबणारे निराळे असतात आणि व्यवस्थेचा फायदा मिळवणे एवढ्या कौशल्यावर मध्यमवर्ग श्रीमंत होत असतो.

त्यामुळे परत प्रश्न विकास म्हणजे काय? - यावर जातो. सामूहिक विकास म्हणजे काय? समूहाची व्याख्या राष्ट्र ही असणे कितपत बरोबर आहे? सामूहिक विकास समूहातील काही टक्क्यांचे शोषण झाल्याखेरीज होतच नसेल तरी तो न्याय्य ठरतो का? राष्ट्र ही अस्मिता उभी केली की असे शोषण सोपे जाते. 'आपला चीन जगातील क्रमांक एकचा देश व्हायला पाहिजे' अशा स्वरुपात जर जनतेपुढे 'विकास' हे आव्हान म्हणून दिले, तर 'या विकासाने माझ्या नदीचे पाणी दूषित होत आहे' असे म्हणणे हा देशद्रोह होतो.

चीनच्या विकासाचा हा आढावा एकूण मानवी हावरट



*धुरात हरवलेली शहरे ...*

प्रवृत्ती, सत्तेचे स्वरुप, शोषणाची शाश्वती आणि दमनाचे विविध अवतार या संदर्भात पहायला हवा.

त्याबरोबरच केवळ लोकशाही आहे म्हणून सरकारवर टीका करायला प्रसारमाध्यमांना मुभा आहे, किंवा निषेध करायला, रस्त्यावर यायला लोकांना स्वातंत्र्य आहे इथपर्यंतच विकासाचा भांडवलशाही दिशेने चाललेला प्रवास रोखता येतो का? या निषेधाचा सरकारी धोरणांवर, भांडवलशाहीच्या प्रवासावर खरोखर किती परिणाम होतो? किती योजना रद्द केल्या जातात किंवा पर्यायी विकासाच्या किती योजना मोठ्या प्रमाणावर राबवल्या जातात? किमान, भांडवलशाही विकास या निषेधांमुळे मानवी अंगाने होतो का हाही मुद्दा विचारार्ह आहे.

*(लेखातील चीनच्या संदर्भातील बहुतेक आकडेवारी जागतिक बँकेने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार आहे. ती माहिती प्रसिद्ध झाल्यास सामाजिक अस्थैर्य वाढेल म्हणून चीन सरकारने ती दाबून ठेवण्याचा प्रयत्न केला होता.)*

*www.art-non-deco.com*